रविवार दि. १९ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३१८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक

### जिल्हा वार्षिक योजना सन २०२६ -२०२७ साठी ५४७.९७ कोटी रुपयांच्या आराखड्याला मान्यता
### विकासकामांना गती, निधीचा प्रभावी वापर आणि वेळेत अंमलबजावणीवर भर

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासाला गती देण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी ५४७.९७ कोटी रुपयांच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला. मंजूर कामे गुणवत्तापूर्ण व विहित मुदतीत पूर्ण करून उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करण्यावर भर देत, विकासकामांच्या अंमलबजावणीला अधिक गती देण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या. जिल्हा नियोजन समितीची बैठक आज जिल्हा नियोजन भवन येथे पार पडली. बैठकीस खासदार कल्याण काळे, आमदार सर्वश्री अर्जुन खोतकर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, संतोष दानवे, हिकमत उढाण, विक्रम काळे, सुहास शिरसाठ, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, पोलिस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, महापालिका आयुक्त अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल आणि जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी




यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत सन २०२६-२७ या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या (सर्वसाधारण) ४७० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ७५ कोटी, एकात्मिक आदिवासी विकासाठी २.९७ अशा एकूण ५४७.९७ कोटी रुपयांचा जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा समितीसमोर सादर करण्यात आला व त्यावर सविस्तर चर्चा करून मान्यता देण्यात आली.

बैठकीत मागील तीन वर्षांतील जिल्हा वार्षिक योजनेच्या कामांचा आढावा घेण्यात आला. खासदार कल्याण काळे आणि आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे यांनी मंजूर निधी वेळेत खर्च न झाल्याने तो शासनाकडे परत गेल्याबाबत प्रश्न उपस्थित करत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली.

यावर पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी रखडलेल्या कामांची संख्या, त्यासंदर्भात करण्यात आलेली कार्यवाही आणि संबंधित कामे कशा पद्धतीने पूर्ण करण्यात येणार आहेत, याबाबत संबंधित विभागांनी सात दिवसांत सविस्तर अहवाल व सादरीकरण सादर करण्याचे निर्देश दिले. सखोल चौकशीनंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच यापुढे सर्व प्रशासकीय यंत्रणांनी जिल्हा वार्षिक योजनेतील मंजूर कामे विहित मुदतीत पूर्ण करून प्राप्त निधी नियोजित कालावधीत खर्च करण्याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

बैठकीत जाफराबाद, मंठा आणि परतूर येथील दिवाणी न्यायालयांच्या इमारतींमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषद बांधकाम विभाग, समाजकल्याण विभाग, आरोग्य केंद्रे, रस्ते विकास तसेच (पान २ वर)

## गुटखा जप्ती प्रकरणात सदर बाजार पोलिसांवर मेहरबानीचा आरोप; मनसेची सखोल चौकशीची मागणी

### मुख्य आरोपी व पुरवठादारांना वाचविण्याचा प्रयत्न; तपास अधिकाऱ्यावर कारवाई न झाल्यास उपोषणाचा इशारा

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील गाजलेल्या गुटखा जप्ती प्रकरणात सदर बाजार पोलिसांच्या तपासावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या प्रकरणात केवळ चालकावर कारवाई करून गुटखा माफिया, पुरवठादार आणि वाहनमालकाला वाचविण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप मनसेने केला असून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व सखोल चौकशी करून दोषी तपास अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी




जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. मनसेचे जिल्हा सचिव विलास तिकांडे, शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे, विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब काळे, जिल्हा उपाध्यक्ष शरद मांगदरे आणि कामगार सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक वैद्य यांनी शनिवारी (१८ जुलै) पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात अनेक गंभीर आरोप केले आहेत.

निवेदनानुसार, राज्यात जर्दामिश्रित गुटख्याच्या उत्पादन, वाहतूक (पान २ वर)

## मुलींच्या निरोगी भविष्यासाठी एच.पी.व्ही. लसीकरण अत्यावश्यक; आयुक्त अंजली शर्मा यांचे आवाहन

### जालना मनपातर्फे एच.पी.व्ही. लसीकरण जनजागृती मोहिमेचा शुभारंभ; सरस्वती भुवन शाळेत विद्यार्थिनी व पालकांचा उत्स्फूर्त सहभाग

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासारख्या गंभीर आजारापासून संरक्षण मिळावे, या उद्देशाने जालना शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभाग आणि आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने एच.पी.व्ही. (ह्युमन



पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण जनजागृती मोहिमेचा शुभारंभ शुक्रवारी सरस्वती भुवन शाळेत उत्साहात करण्यात आला. या मोहिमेचा शुभारंभ महानगरपालिका आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमात १४ ते १५ वर्षे वयोगटातील विद्यार्थिनी तसेच त्यांच्या पालकांसाठी विशेष संवाद आणि समुपदेशन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. एच.पी.व्ही. लसीचे महत्त्व, तिचे आरोग्यदायी फायदे, लसीबाबत समाजात (पान २ वर)



# संपादकीय....

## खड्ड्यांत अडकलेला विकास... टेंभुर्णी-कुंभारझरी रस्त्याला न्याय कधी?

टेंभुर्णी- कुंभारझरी हा केवळ एक ग्रामीण रस्ता नाही, तर हजारो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाला जोडणारी जीवनवाहिनी आहे. शेतकऱ्यांचा शेतमाल, विद्यार्थ्यांचे शिक्षण, रुग्णांचे उपचार, कामगारांची रोजीरोटी आणि ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन या रस्त्यावर अवलंबून आहे. मात्र आज या मार्गाची झालेली दयनीय अवस्था विकासाच्या दाव्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे.

पावसाळा आला की रस्त्यांवर खड्डे पडतात, ही बाब आता नवीन राहिलेली नाही. परंतु दरवर्षी त्याच रस्त्यावर तात्पुरती मलमपट्टी करणे, काही दिवसांतच ती उखडणे आणि पुन्हा त्याच समस्येची पुनरावृत्ती होणे, ही केवळ तांत्रिक चूक नसून नियोजनातील त्रुटी, कामाच्या दर्जावर प्रश्न आणि उत्तरदायित्वाच्या अभावाचे द्योतक आहे. शासनाकडून निधी उपलब्ध होत असताना त्याचा परिणाम नागरिकांना दर्जेदार रस्त्यांच्या स्वरूपात का दिसत नाही, हा प्रश्न रास्त आहे. टेंभुर्णीकुंभारझरी मार्गावरील परिस्थिती विशेषतः पावसाळ्यात अधिक गंभीर बनते. पाण्याखाली लपलेले खड्डे, अरुंद रस्ता आणि अपुरी सुरक्षितता यामुळे प्रत्येक प्रवास धोकादायक ठरतो. दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णवाहिकांसाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. एखादा अपघात झाल्यानंतर प्रशासन जागे होण्यापेक्षा, अपघात होऊ नयेत यासाठी आधीच उपाययोजना करणे हीच खरी जबाबदारी आहे. या प्रश्नाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे कामाच्या गुणवत्तेचे परीक्षण. रस्ता बांधल्यानंतर काही महिन्यांतच तो उखडत असेल, तर त्यामागील कारणांचा वस्तुनिष्ठ तपास होणे आवश्यक आहे. संबंधित ठेकेदारांनी करारातील अटींचे पालन केले का, कामाची गुणवत्ता तपासण्यात आली का, दोषी आढळल्यास कोणावर कारवाई झाली का, अशा प्रश्नांची उत्तरे नागरिकांना मिळाली पाहिजेत. विकासकामांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व नसल्यास सार्वजनिक पैशांचा योग्य उपयोग होत असल्याचा विश्वास निर्माण होणार नाही.

ग्रामीण भागातील रस्ते ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून स्थानिक अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. खराब रस्त्यांमुळे शेतमाल बाजारात पोहोचण्यास विलंब होतो, वाहनांचा खर्च वाढतो, उद्योग-व्यवसायावर परिणाम होतो आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही विपरीत परिणाम होतो. त्यामुळे रस्त्यांच्या समस्येकडे केवळ सार्वजनिक बांधकामाचा विषय म्हणून न पाहता, ग्रामीण विकास आणि आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी या प्रश्नावर परस्परांवर जबाबदारी ढकलण्याऐवजी समन्वयाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. तातडीने रस्त्याची पाहणी, आवश्यक निधीची उपलब्धता, दर्जेदार व कायमस्वरूपी दुरुस्ती, आवश्यक त्या ठिकाणी रुंदीकरण आणि नियमित देखभाल यासाठी ठोस कृती आराखडा जाहीर केला पाहिजे.

नागरिकांचा संताप हा केवळ खराब रस्त्याविषयी नाही; तो दुर्लक्षाविरुद्ध आहे. लोक कर भरतात, विकासाची अपेक्षा करतात आणि सुरक्षित प्रवास हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे टेंभुर्णीकुंभारझरी रस्त्याचा प्रश्न हा केवळ एका गावाचा प्रश्न न राहता, प्रशासनाच्या कार्यक्षमतेची आणि विकासाच्या प्रामाणिकतेची कसोटी ठरत आहे. आजही वेळ गेलेली नाही. प्रशासनाने संवेदनशीलता दाखवत तातडीने प्रभावी पावले उचलली, तर नागरिकांचा विश्वास टिकून राहील. अन्यथा खड्ड्यांमध्ये केवळ रस्ता नाही, तर विकासाची आश्वासनेही गाडली जातील.

# बहुविध प्रतिभेचे धनी डॉ. जयंत नारळीकर

जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांची आज जयंती. १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले.

आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला. २० मे २०२५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन !

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# गूराढोरांवर आपली आस्था असतांना;शहरात गुर-ढोर वाऱ्यावर का?

आपण पहातो ही, राज्यातील अनेक शहरांमध्ये गुरेढोरे लावारीस मोकाट फिरतांना दिसतात किंवा रस्त्यावर मोकाट जनावरांचा ठिय्या दिसून येतो.यामुळे वाहनचालकांचा किंवा जनावरांचा अपघात होऊन जीव धोक्यात येऊ शकतो आणि अशा अनेक दुर्घटना झाल्या सुध्दा आहेत व ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. तरीही सरकार किंवा प्रशासन याकडे जातीने लक्ष देत नाही हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये गायीला अत्यंत मोलाचे आणि महत्त्वाचे स्थान आहे त्यामुळे तीला गोमाता म्हणून संबोधले जाते.परंतु आज मोठ्या प्रमाणात गायी (गुरेढोरे) रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर किंवा मुलांच्या खेळण्याच्या ग्राऊंडमध्ये बसलेले दिसतात आणि आपल्या आहारासाठी व विसाव्यासाठी भटकत असतात. त्याचप्रमाणे गायी जेव्हा रस्त्यावर किंवा वस्तीमध्ये फिरतात तेव्हा त्यांचा झुंड कचऱ्याच्या ढीगाऱ्याकडे जातांना जास्त दिसते कारण त्यांना आशा असते की, इथे मला काही तरी नक्कीच खायला मिळेल परंतु याठिकाणी त्यांच्या दृष्टीने संपूर्ण विषेली पदार्थ असतात.अशा परिस्थितीत गुरेढोरे जहरील्या वस्तू खातात;ज्या त्यांच्या शरीराला घातक असतात. उदाहरण द्यायचे झाले तर,प्लास्टिक,कपडा किंवा प्लॅस्टिकमध्ये इंजेक्शन किंवा ब्लेड किंवा विषेली पदार्थ सुद्धा असू शकतात;त्या जर त्यांच्या पोटात चुकीने गेल्या तर त्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही.अशा परिस्थितीत मनपा प्रशासन व नगरसेवकांचे दायित्व असते की,गोरक्षाच्या माध्यमातून प्रत्येक जनावरांचा जीव वाचविला पाहिजे.परंतु त्यांची रक्षा न करता त्यांना वाऱ्यावर सोडल्याचे चित्र नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये मोकाट फिरणाऱ्या गुराढोरांवरून लक्षात येते. उदाहरण द्यायचे झाले तर,नागपूर येथील प्रभाग क्रमांक ३१ मध्ये राजीव गांधी पार्क या ठिकाणी बास्केट बॉल ग्राउंड आहे. परंतु या ग्राउंडमध्ये मोठ्या प्रमाणात गुरेढोरे जमा होतात. अशा परिस्थितीत ते आपसात भिडतात व त्यांची टक्कर होते अशा परिस्थितीत बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंचा अपघात होऊ शकतो. या संपूर्ण बाबींचा विचार करून मनपा प्रशासनाने आणि नगरसेवकांनी यावर तोडगा काढुन गुराढोरांसाठी योग्य जागा उपलब्ध करावी किंवा मोकाट जनावरांना गोशाळेत स्थान द्यावे.कारण गुरेढोरे रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर बसले असतात तेव्हा त्यांचा किंवा मानवी अपघात सुध्दा होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही.याकरीता मोकाट फिरणाऱ्या जनावरांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने पुर्वनीयोजीत उपाययोजना करणे गरजेचे आहे.

मोकाट जनावरांचा सर्वसामान्यांना त्रास नाहीच परंतु त्यांच्या खानपानात विषेली वस्तू जाने किंवा कळतनकळत रस्त्यावर बसलेल्या जनावरांचा किंवा मानवी अपघात होने ही दुःख बाब आहे.त्यामुळे नागपूर शहरात असो अथवा राज्यातील इतर शहरात असो मोकाट गुराढोरांची व्यवस्था गोशाळेत व्हायला पाहिजे हे प्रशासनाचे दायित्व आहे.मुसळधार पाऊस,निसरडे रस्ते, रस्त्यावरील खड्डे,कमी झालेली दृश्यमानता आणि त्यातच अचानक समोर येणारे मोकाट जनावरे नागपूरकर वाहनचालकांसाठी हा अनुभव रोजचाच झाला आहे आणि हिच स्थिती राज्यातील अनेक शहरांमध्ये असु शकते. अशाप्रकारे पावसाळ्यात रस्त्यावर वाढलेल्या



मोकाट जनावरांच्या वावरामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये वर्षांगणिक मोकाट जनावरांचा प्रश्न अधिक गंभीर होत असल्याचे दिसून येते. यामुळे पावसाळ्यात संभाव्य अपघात टाळण्यासाठी मनपा प्रशासनाने तातडीने विशेष मोहीम राबवून मोकाट जनावरांना योग्य स्थान देऊन त्यांना गोशाळेत पाठविण्यात आले पाहिजे, तसेच निष्काळजी पशुपालकांवर कारवाई करून शहरातील प्रमुख रस्ते,मुलांचे खेळण्याचे ग्राउंड सुरक्षित करावेत.मोकाट जनावरांचा किंवा मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या मानवी दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने मोकाट जनावरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची नितांत आवश्यकता आहे.यामुळे मोकाट जनावरांची रहाण्याची, खानपानची योग्य सुविधा होईल व अपघातावर आळा बसेल.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# उपवर्गीकरण विरोधी संघर्ष मोर्चात २१ जुलै समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे मिलिंद बोर्ड यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी :**

अनुसूचित जातीं च्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ रोजी जालना येथे आयोजित करण्यात आलेल्या आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष मोर्चा मध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बहूजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे मराठवाडा सचिव मिलिंद बोर्ड जालना जिल्हा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून सकाळी प्रारंभ होईल. अंबड चौफुली येथे सभा घेण्यात येईल. तसेच शिष्टमंडळामार्फत शासनाला जिल्हाधिकारी यांच्या तर्फे निवेदन देण्यात येणार आहे आरक्षण उपवर्गीकरणाच्या सार्वोच्य न्यायालयाच्या निर्णयाविरोधात संविधानिक आणि लोकशाही मार्गाने समाजाची भूमिका शासनापर्यंत पोहोचविणे हा मोर्चाचा प्रमुख उद्देश आहे. मोर्चात जालना जिल्ह्यातील सर्व समाज बांधव, माता-भगिनी, युवक-युवती तसेच समाजहिताची जाणीव असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रत्येक गाव, वस्ती आणि परिसरातून जास्तीत जास्त उपस्थिती राहून समाजाची एकजूट दाखववी, असेही संघटनेने नमूद केले आहे.

मोर्चा शांततापूर्ण व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडत संविधानिक मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन करत, सर्वांनी वेळेत उपस्थित राहून संघर्ष मोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन वीआरएसपीचे मराठवाडा सचिव मिलिंद बोर्डे यांनी केले आहे. या मोर्चा मध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर साहेब, भारतीय बौध्द महासभेचे भीमराव आंबेडकर साहेब, बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे अॅड. सुरेश माने साहेब, आमदार राजकुमार बडोले साहेब, चर्मकार महासंघाचे अध्यक्ष ववनराव घोलप साहेब यांची उपस्थीती राहील, आयोजकांमार्फत मोटर वाहन पार्कीग विषयी वेळोवेळी सुचना देण्यात येतील त्यांचे पालन करावे, तसेच शिस्तीचा समाज आहे याचे भान ठेऊन आपला मोर्चा यशस्वी पणे पार पाडावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# जनतेच्या सेवेला वाहिलेले नेतृत्व; खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा आणि पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम

**जालना । प्रतिनिधी**

जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, १९ जुलै २०२६ रोजी जालना शहरात विविध सामाजिक व सेवाभावी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जनसेवा, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धन या त्रिसूत्रीवर आधारित या उपक्रमांद्वारे खासदार डॉ. काळे यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. याच अनुषंगाने सकाळी ११ वाजता जुना जालना येथील गांधी चमन परिसरातील महिला सामान्य रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळवाटप करण्यात येणार आहे. तसेच शहरातील विविध भागांमध्ये वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला जाणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन माजी युवा काँग्रेस अध्यक्ष (जालना विधानसभा) सय्यद करीम बिल्डर आणि जालना शहर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांनी केले आहे.



आयोजकांच्या वतीने खासदार डॉ. कल्याण काळे यांचा सत्कार करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात येणार आहेत. दरम्यान, जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मातोश्री लॉन्स येथेही वाढदिवसानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, खासदार डॉ. कल्याण काळे स्वतः उपस्थित राहून कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांकडून शुभेच्छा स्वीकारणार आहेत.

**सेवा, संवेदनशीलता आणि विकासाचा चेहरा**

वैद्यकीय व्यवसायातून सार्वजनिक जीवनात आलेले डॉ. कल्याण काळे हे जालना जिल्ह्यातील एक अभ्यासू, संयमी आणि लोकाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जातात. डॉक्टर म्हणून रुग्णसेवा करत असताना त्यांनी सामान्य नागरिकांच्या समस्या जवळून अनुभवल्या. त्याच अनुभवातून त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय भूमिका स्वीकारली.

पान १ व ४ वरुन...

### पालकमंत्री पंकजा मुंडे...

लोक प्रतिनिधींच्या मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी निधी मंजुरीसह अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीच्या प्रारंभी पालकमंत्री पंकजा मुंडे, उपस्थित लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित दादा पवार तसेच माजी आमदार दिवंगत सुरेश जेठलिया यांना श्रद्धांजली अर्पण केली. तसेच शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना आणि वीजबिल सवलतीची घोषणा केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करणारा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या अभिनंदन ठरावाची प्रत मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविण्याबाबत आवश्यक नियोजन करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सन २०२६-२७ च्या जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्याचे सादरीकरण केले.

बैठकीचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांनी केले. बैठकीस जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

### गुटखा जप्ती...

साठवणूक आणि विक्रीवर बंदी असतानाही गुटखा तस्करी सुरू असून, अशा प्रकरणांमध्ये कठोर कारवाई केली जात आहे. मात्र जालना शहरातील सदर बाजार पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात घडलेल्या गुटखा जप्ती प्रकरणात तपासात हलगर्जीपणा झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मनसेच्या म्हणण्यानुसार, ७ जुलै २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापळा रचून एमएच-२१-बीएच-७४०० क्रमांकाचा पिकअप पकडला होता. या वाहनातून सुमारे सहा लाख रुपयांहून अधिक किमतीचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला होता. चालक शेख महेबुब याला ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी सदर बाजार पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले होते. त्यानंतर सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तपास एपीआय साबळे यांच्याकडे सोपविण्यात आला.

मात्र, चालकाची पोलीस कोठडी मागितली गेली नाही. त्यामुळे गुटखा नेमका कोणाचा होता, तो कुठून आणण्यात आला, कोणाला पोहोचविण्यात येत होता, वाहनाचा मालक कोण आहे आणि या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा सखोल तपासच झाला नसल्याचा आरोप मनसेने केला आहे.

याशिवाय, संबंधित पिकअप वाहनावर यापूर्वीही गुटखा वाहतुकीचा गुन्हा दाखल झाल्याचा दावा मनसेने निवेदनात केला आहे. त्यामुळे केवळ चालकावर कारवाई करून थांबण्याऐवजी वाहनमालक, गुटखा पुरवठादार आणि संपूर्ण रॅकेटमधील संबंधितांवरही गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.तपासादरम्यान आर्थिक तडजोड करून गुटखा माफियांना वाचविण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोपही मनसेने निवेदनात केला आहे. अशा प्रकारामुळे पोलीस दलाच्या प्रतिमेला धक्का बसत असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल केली जात असल्याचा दावाही करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी तपास अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करावी, अन्यथा मनसेच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. तसेच योग्य कारवाई न झाल्यास विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही मनसेने दिला आहे.

दरम्यान, मनसेने केलेले आरोप हे निवेदनातील असून, या प्रकरणात सदर बाजार पोलीस किंवा संबंधित तपास अधिकाऱ्यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

### मुलींच्या निरोगी...

असलेले गैरसमज आणि त्यांचे निरसन याविषयी तज्ज्ञ डॉक्टरांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हा स्त्री रुग्णालयाचे डॉ. गवारे आणि जालना महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. संगीता देशमुख राजे यांनी एच.पी.व्ही. संसर्गामुळे होणाऱ्या आजारांबाबत माहिती देत, योग्य वयात लसीकरण केल्यास भविष्यात गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो, असे सांगितले. लसीकरणाबाबत कोणतीही भीती किंवा गैरसमज बाळगू नयेत, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमात बोलताना आयुक्त अंजली शर्मा यांनी मुलींच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित केली. ''आजच्या काळात एच.पी.व्ही. लस ही मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक पालकाने आपल्या मुलीचे वेळेत लसीकरण करून तिच्या निरोगी आणि सुरक्षित भविष्यासाठी पुढाकार घ्यावा. ही केवळ एक लस नसून गंभीर आजारापासून संरक्षण देणारे प्रभावी कवच आहे,'' असे त्या म्हणाल्या.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. संध्या संजय देठे यांनी सांगितले की, ही लस जिल्हा आरोग्य केंद्र, जालना महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये तसेच महिला व बाल रुग्णालयात पूर्णपणे मोफत उपलब्ध असून पात्र मुलींनी या सुविधेचा लाभ घ्यावा. कार्यक्रमादरम्यान उपस्थित विद्यार्थिनी आणि पालकांच्या विविध शंकांचे तज्ज्ञ डॉक्टरांनी समाधान केले. समुपदेशनानंतर अनेक विद्यार्थिनींनी एच.पी.व्ही. लस घेण्याचा निर्णय घेतला. मोहिमेच्या प्रारंभी आयुक्त अंजली शर्मा यांच्या हस्ते प्रतीकात्मकरीत्या लसीकरण उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. देशमुख यांनी केली, तर सूत्रसंचालन सौ. वीणा जोशी यांनी केले.

यावेळी आरोग्य व स्वच्छता समितीचे सभापती कपिल भुरेवाल, उपसभापती पद्मा मानधने, सरस्वती भुवन विद्यालयाचे मुख्याध्यापक बहिरे सर, शिक्षक, आरोग्य कर्मचारी, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

महानगरपालिकेने सुरू केलेली ही जनजागृती मोहीम शहरातील अधिकाधिक मुलींपर्यंत पोहोचवून त्यांचे वेळेत लसीकरण करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

### जमनाबाई बगडिया...

ते पुढेही जपण्याचा माझा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी मुख्याध्यापिका अनीता पवार यांनी प्रास्ताविकातून ट्रस्टच्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेत समाजहितासाठी सुरू असलेल्या सेवाकार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमास प्रभाकर सावंत, बाबासाहेब पवार, अमोल देशमुख, संदीप तोडावत यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक पवन जोशी यांनी केले, तर विष्णू पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### एकट्याने पंढरीची...

वेगळ्या दिंडीची सध्या परिसरात मोठी चर्चा रंगली आहे. लक्ष्मण शिंदे हे मागील नऊ वर्षांपासून सातत्याने पंढरपूरची वारी करत आहेत. आतापर्यंत ते आळंदीपर्यंत बसने जाऊन माऊलींच्या दिंडीत सहभागी होत असत. मात्र, यावर्षी त्यांनी घरापासूनच पायी वारीचा संकल्प केला होता. यासाठी ते कुंभारझरी येथील ह.भ.प. सोनुने गुरुजींच्या दिंडीत सहभागी होणार होते. परंत. ऐनवेळी काही कौटुंबिक अडचणींमुळे त्यांना वेळेवर निघता आले नाही. वारीची ओढ स्वस्थ बसू देईना, म्हणून त्यांनी दिंडी निघाल्यानंतर ३ दिवसांनी घरापासून एकट्यानेच पायी प्रवास सुरू केला. मंगळवारी टेंभुर्णीतून निघालेल्या शिंदे यांनी पहिल्या दिवशी ४० किलोमीटरचे अंतर कापत जालन्यात मुक्काम केला. आता ते दररोज २५ ते ३० किलोमीटरचा टप्पा पूर्ण करत आहेत. या प्रवासाबाबत ते म्हणतात, ''दिंडीत मी एकटा चालत असलो, तरी सदैव पांडुरंग सोबत असल्याचा भास होतो.''

### एससी उपवर्गीकरणाच्या...

असून संपूर्ण परिसर निळ्या ध्वजांनी सजू लागला आहे. मोर्चा यशस्वी करण्यासाठी समाजातील विविध संघटना, कार्यकर्ते, युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिक स्वयंस्फूर्तीने पुढे येत असून हा मोर्चा एससी उपवर्गीकरणाच्या विरोधातील एकजुटीचे आणि सामाजिक ऐक्याचे प्रभावी दर्शन घडविणारा ठरणार असल्याचा विश्वास आयोजक म्हणून उपवर्गीकरण विरोधी समन्वय समितीच्या वतीने व्यक्त केला आहे.

# जंतर-मंतरवर 'हिंदू देवतांचा अवमान आणि 'हेट स्पीच'
# कुणाल कामरा व प्रकाश राज यांच्यावर गुन्हा दाखल करा !
## हिंदु जनजागृती समिती व सर्वोच्च न्यायालयातील वकीलांची मागणी



**नवी दिल्ली - प्रतिनिधी**

जंतर-मंतर येथे 'कॉकरोच जनता पार्टी' () आणि सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली नीट () परीक्षेच्या प्रश्नावर सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात उघडपणे हिंदु धर्माचा अपमान आणि देशविरोधी चिथावणी दिली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याविरोधात आज सर्वोच्च न्यायालयाचे वकील आणि 'हिंदु जनजागृती समिती'च्या संयुक्त शिष्टमंडळाने नवी दिल्लीतील संसद मार्ग पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली असून कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

संसद मार्ग पोलीस ठाण्याचे एसएचओ यांना प्रत्यक्ष भेटून हे निवेदन देण्यात आले. या शिष्टमंडळात सर्वोच्च न्यायालयाचे अधि. मकरंद अडकर, अधि. अमिता सचदेवा, अधि. अतुल शर्मा, अधि. मयंक द्विवेदी, अधि. केशरी सत्या, अधि. पार्थ यादव, अधि. यादवेंद्र सक्सेना यांच्यासह हिंदु जनजागृती समितीचे दिल्ली राज्य समन्वयक श्री. कार्तिक साळुंखे आणि श्री. श्रीराम लुकतुके यांचा समावेश होता.तक्रारीत म्हटले आहे की, स्टँड-अप कॉमेडियन कुणाल कामराने मंचावरून ''हे सरकार अनेक वर्षांपासून सीताच्या पतीचे (रामाचे) नाव घेऊन नीताच्या पतीचे (मुकेश अंबानीचे) काम करत आहे,'' असे अत्यंत अपमानास्पद विधान करून १०० कोटी हिंदूंच्या भावना दुखावल्या आहेत. आंदोलनाच्या मंचावरून एका महिलेने ''सब बुत उठवाए जाएंगे... बस नाम रहेगा अल्लाह का'' (सर्व मूर्ती हटवल्या जातील आणि केवळ अल्लाहचे नाव राहील) हे पाकिस्तानी कवी फैज अहमद फैज यांचे भडकावू गाणे गायले. हा थेट मूर्तीपूजक हिंदु धर्मावरील हल्ला आहे. या मंचावर 'सिमी' () या भारत सरकारने बंदी घातलेल्या कट्टरपंथी संघटनेशी संबंधित असलेले आणि दिल्ली दंगलीतील आरोपी उमर खालिदचे वडील सय्यद कासिम रसूल इलियास हे देखील उपस्थित होते. तसेच अभिनेता प्रकाश राज यांनी मंचावरून 'आम्हाला दहशतवादी किंवा पाकिस्तानी म्हटले तरी पर्वा नाही,' असे म्हणत तरुणांना व्यवस्थेविरोधात विद्रोह व बंड करण्यासाठी भडकावले.

हे विद्यार्थ्यांचे आंदोलन नसून देशविरोधी आणि वामपंथी विचारांच्या लोकांचा हा एक राजकीय अजेंडा आहे, हे यावरून स्पष्ट होते. या निवेदनात सर्वोच्च न्यायालयाने 'हेट स्पीच' (द्वेषपूर्ण भाषण) प्रकरणी दिलेल्या ऐतिहासिक निकालाचा (शाहीन अब्दुल्ला विरुद्ध भारत संघ) संदर्भ देण्यात आला असून त्यानुसार पोलिसांनी स्वतःहून तत्काळ कारवाई करावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २९९ (धार्मिक भावना दुखावणे), १९६ (शत्रुत्व पसरवणे), १५२ (देशाच्या अखंडतेला धोका) आणि ३५३ (भडकावू विधाने) अंतर्गत तत्काळ गुन्हा () दाखल करण्याची मागणी केली आहे; तसेच या आंदोलनाच्या फंडिंगची आणि 'सिमी'शी संबंधित लोकांच्या सहभागाची बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक () कायद्यांतर्गत सखोल चौकशी करण्याची मागणी केंद्रीय गृहमंत्री आणि दिल्ली पोलीस आयुक्तांकडेही या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

**आपला नम्र,**
**श्री. रमेश शिंदे,**
**राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती,**
**(संपर्क क्र.: ९९८७९६६६६६)**

# पालकांच्या पुढाकारातून साकारणार डिजिटल क्लासरुम
## पाटोदा येथील जिल्हा परिषद शाळेत पालक सहविचार सभा संपन्न



**मंठा - प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा येथे पालकांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांसाठी आधुनिक डिजिटल क्लासरूम उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पालकांनी एकजुटीने पुढाकार घेत एक लाख रुपयांपेक्षा अधिक लोकवर्गणी जमा करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर केला.

पालक सहविचार सभा पाटोदा येथील जिल्हा परिषद शाळेत १८ जुलै, २०२६ रोजी संपन्न झाली. या सभेत हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. सभेच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

शाळेच्या भौतिक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी पालकांनी आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन शिक्षकांनी केले होते, त्यांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत पालकांनी डिजिटल क्लासरूमसह विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. या सभेस


शाळेतील शिक्षकांसह यावेळी मोठ्या संख्येने पालकांची उपस्थिती होती. पालकांच्या या सकारात्मक पुढाकारामुळे पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत लवकरच डिजिटल क्लासरूम साकार होणार असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नवी संधी उपलब्ध होणार आहे.

# मादक पदार्थ व बालविवाह सर्वांसाठी घातक - डॉ. प्रतीक सुराणा
## नशामुक्त व बालविवाह प्रतिबंध जनजागृती पंधरवाडा निमित्त व्याख्यान

**सिल्लोड - प्रतिनिधी**

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, नॅशनल ॲक्शन प्लॅन फॉर ड्रग डिमांड रिडक्शन (एनएपीडीडीआर) या अंमली पदार्थांच्या व्यसनात घट आणण्यासाठीच्या राष्ट्रीय कृती योजनेअंतर्गत, १५ ऑगस्ट २०२० रोजी सुरू केलेल्या नशा मुक्त भारत अभियान या प्रमुख उपक्रमाद्वारे अंमली पदार्थमुक्त भारत घडवण्याच्या आपल्या वचनबद्धतेची सातत्याने पूर्तता करत आहे. हे अभियान अंमली पदार्थांच्या गैरवापराविरुद्ध देशव्यापी चळवळ उभारून जनजागृती निर्मिती, सामुदायिक सहभाग, उपचार, पुनर्वसन, काळजी आणि सामाजिक पुनर्रचना याद्वारे अंमली पदार्थांच्या सेवनाला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करते.

सुरुवातीला २७२ संवेदनशील जिल्ह्यांमध्ये सुरू झालेली ही मोहीम आता संपूर्ण देशभरात विस्तारली आहे. सातत्यपूर्ण जनजागृती आणि सामुदायिक एकत्रिकरणाच्या उपक्रमांमुळे हे अभियान तब्बल २९ कोटींहून अधिक लोकांपर्यंत पोहोचले आहे. यामध्ये ११ कोटींहून अधिक युवक आणि ८ कोटी महिलांचा समावेश आहे.



प्रति पंढरपूर समजल्या जाणारे आनंदी स्वामी महाराज आषाढी एकादशी निमित्तमंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली व उद्यापासून यात्रा उत्सव उद्यापासून प्रारंभ होत आहे.

**छायाचित्र किरण खानापुरे**

# तुकाराम मुंढे नावाचे वादळ

महाराष्ट्रातील प्रामाणिक, कडक शिस्तीचे आणि धडाकेबाज सनदी अधिकारी () तुकाराम मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची गरज आज संपूर्ण प्रशासनाला आहे, ही भावना सर्वसामान्य जनतेच्या मनात तीव्रपणे निर्माण झाली आहे. आपल्या २१ वर्षांच्या कारकिर्दीत तब्बल २५ वेळा बदली होऊनही त्यांनी भ्रष्टाचाराविरोधात आणि नियमांच्या अंमलबजावणीसाठी घेतलेली ठाम भूमिका हेच त्यांच्या लोकप्रियतेचे मुख्य कारण आहे.

राजकीय दबावाला बळी न पडण्याच्या आणि कठोर कार्यशैलीमुळे त्यांची सरासरी दर वर्षाला बदली झाली आहे. प्रशासनात आणि समाजात त्यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची गरज का वाटते ?, याची काही प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.


कडक शिस्त आणि पारदर्शकता, नियम पाळण्यावर भर आहे. राजकीय किंवा सामाजिक दबावाला बळी न पडता ते केवळ कायद्याच्या चौकटीत राहून काम करतात. भ्रष्टाचाराला आळा घालणे हे महत्त्वाचे काम प्राधान्याने करतात. ते ज्या विभागात जातात, तिथली भ्रष्ट साखळी मोडून काढतात आणि पारदर्शकता आणतात. सर्वसामान्यांचे हित आणि जनसामान्यांचा पाठिंबा जनतेचे प्रश्न सोडवणे हेच त्यांचे कार्य वैशिष्ट्य आहे. नागपूर व नाशिक महानगरपालिका आयुक्त किंवा दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव असताना त्यांनी थेट सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय घेतले. लोकांचा विश्वास संपादक केला. त्यांच्या प्रामाणिकपणामुळे सामान्य जनता त्यांच्या बदलीविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करते, जे सहसा सनदी अधिकाऱ्यांच्या बाबतीत पाहायला मिळत नाही. किंवा क्वचितच पाहायला मिळते.

धडाकेबाज आणि तत्पर कार्यपद्धती त्वरित निर्णय घेतात. अन्न व औषध प्रशासन () आयुक्तपदाचा पदभार स्वीकारताच आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी राज्यभरात सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र ही विशेष मोहीम सुरू केली आहे. ''जनतेच्या आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही,'' असा कडक इशारा देत त्यांनी अवघ्या काही दिवसांत संपूर्ण राज्यातील भेसळखोर आणि बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणून सोडले आहेत. मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासनाने () केलेल्या धडक कारवायां केल्यात.

१. दूध भेसळीविरोधातील मोठी कारवाई केली. राज्यातील दुधाचे नमुने शुद्धतेच्या चाचणीत अपयशी ठरल्याचे समोर आल्यानंतर त्यांनी ही मोठी मोहीम हाती घेतली. अवघ्या एका महिन्यात एफडीएने () राज्यभरात चारशे हून अधिक छापे टाकले, २३५ एफआयआर () नोंदवले आणि ३५० हून अधिक भेसळखोऱ्यांना अटक केली. कृत्रिम व भेसळयुक्त दूध तयार करणारे अनधिकृत कारखाने/डेअरी युनिट्स सील करण्यात आले. धाराशीव (भूम), सोलापूर आणि पुणे (मंचर) भागात शाम्पू, डिटर्जंट पावडर, युरिया आणि पाम ऑइल वापरून बनवले जाणारे कोट्यवधी लिटरचे कृत्रिम दूध रॅकेट त्यांनी उद्ध्वस्त केले. सांगोल्यात एकाच ठिकाणी ३७ हजार लिटरपेक्षा जास्त भेसळयुक्त दूध जागेवरच नष्ट करण्यात आले.अनेक ठिकाणी दूध भरललेले टँकर, शेकडो कॅन्स दूध,खवा, नाल्यात ओतून दिल्याचे व्ही.डी.ओ.आपण बघितले.

दूध संकलन केंद्रांपासून ते वितरणापर्यंत पारदर्शकता आणण्यासाठी त्यांनी २५ कडक नियमांची नियमावली लागू केली आहे.अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत मानवी आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोऱ्यांना थेट जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद असल्याचे सांगत त्यांनी कडक इशारा दिला आहे. २. गुटखा बंदी व कडक कारवाई केली.महाराष्ट्रात २०१२ पासून गुटखा बंदी असली, तरी शेजारील राज्यांतून होणारी तस्करी रोखण्यासाठी मुंढे यांनी विशेष मोहीम उघडली आहे. ठिकाणी छापे टाकून राज्यभरात गुटख्याची साठवणूक आणि विक्री करणाऱ्या हजार जवळपास ठिकाणांवर छापे टाकून कोट्यवधी रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधी तंबाखू जप्त करण्यात आला. अमरावतीमध्येच ५५ लाखांचा गुटखा ट्रकसह पकडला गेला.तर मराठवाड्यात कोटीचे जवळपास गुटखा जप्त केला. गुटखा माफियांवर मकोका () सारखा कडक कायदा लावण्यास सुरुवात केली आहे. याशिवाय, केवळ छोट्या टपऱ्यांवर कारवाई न करता राज्याबाहेरून रॅकेट चालवणाऱ्या मुख्य गुटखा कंपन्यांच्या मालकांना थेट गुन्ह्यात मुख्य आरोपी केले जात आहे. पूर्वी मोठ्या ट्रकमधून होणारी तस्करी आता तस्करांनी कार किंवा छोट्या गाड्यांद्वारे सुरू केली आहे, हे ओळखून त्यांनी तपासणीची यंत्रणा अधिक गतिमान केली आहे.एकंदरीत, तुकाराम मुंढे यांच्या या धडक कारवाईमुळे राज्यातील अन्न आणि दूध माफियांमध्ये मोठी घबराट पसरली आहे.

गुटखा, तंबाखू आणि अन्न भेसळीवर मोठा प्रहार करून भेसळयुक्त अन्नपदार्थांवर बंदी: रसायने आणि स्प्रे मारून कृत्रिमरीत्या पिकवलेले आंबे, निकृष्ट दर्जाचे तूप,पनीर, भेसळयुक्त खवा, दुग्धजन्य पदार्थ, मिठाई आणि आरोग्याला घातक रंग वापरलेल्या खाद्यपदार्थांवर मोठी कारवाई करण्यात आली.तर हॉटेल्स डेअरी या मध्ये




स्वच्छता पाणी वर्तमानपत्राचे कागदात खाद्यपदार्थ देणे शालेय पोषण आहारात दिले जाणारे अन्न, स्वच्छता,मुदत संपलेली औषधी, मिठाई, आणि अनेक एक्सपायरी डेट झालेले वस्तूंचे बाबतीत त्यांचे बारकाईने लक्ष आहे.

धुळे,जळगाव,मुक्ताईनगर, पाचोरा,जालना, भिवंडी, पुणे, सातारा आणि मुंबईसह अनेक जिल्ह्यांमध्ये कोट्यवधी रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, मिठाई, खाद्यपदार्थ जप्त करून अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. औषध विक्रेते आणि थेट क्लिनिकवर छापेमारी करून, भ्रामक जाहिरातींवर कारवाई – गंभीर आजारांवर हमखास आणि चमत्कारिक उपचारांचे दावे करून नागरिकांची दिशाभूल करणाऱ्या आयुर्वेदिक व इतर औषध उत्पादकांवर औषधे व जादूटोणादी कायदा १९५४ अंतर्गत कारवाई करत ७३ लाखांहून अधिकचा साठा जप्त केला. विनापरवाना क्लिनिकवर धाड: नागपुरातील एका मोठ्या त्वचा आणि केस प्रत्यारोपण ( ) क्लिनिकवर थेट धाड टाकून, विनापरवाना अवैध औषधविक्री करणाऱ्यांचा पर्दाफाश केला आणि लाखो रुपयांची औषधे जप्त केली. आता सेलिब्रिटी आणि ब्रँड्सही रडारवर आहेत. तुकाराम मुंढेंनी केवळ स्थानिक उत्पादकांवरच नाही, तर टी.व्ही आणि वृत्तपत्रांमध्ये ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या अवास्तव जाहिरातींमध्ये झळकणाऱ्या मोठमोठ्या स्टार्स आणि सेलिब्रिटींना (ब्रँड ॲम्बेसेडर) थेट कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.अशा या वेगवान आणि तडजोड न करणाऱ्या कार्यपद्धतीमुळे पुन्हा एकदा प्रशासकीय वर्तुळात मुंढे पॅटर्नची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. तुकाराम मुंढे यांच्यासारख्या प्रामाणिक, शिस्तप्रिय आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची आजच्या प्रशासकीय व्यवस्थेत अत्यंत गरज आहे, ही भावना बहुतांश सर्वसामान्य नागरिकांच्या मनात आहे. त्यांनी आपल्या तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही, त्यामुळेच त्यांना जनतेचे प्रचंड समर्थन मिळते. शिक्षण विभाग, सहकार, महसूल, परिवहन, आदिवासी, उत्पादन शुल्क व ईतर अनेक विभागात तुकाराम मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची गरज आहे अशी भावना व्यक्त केली जात आहे.भ्रष्टाचाराला आळा, वाळू माफिया, अवैध धंदे आणि कंत्राटदारांची युती तोडण्यासाठी अशा अधिकाऱ्यांची मोठी मदत होते.प्रशासकीय शिस्त, सरकारी कर्मचाऱ्यांची कामावरील अनुपस्थिती रोखणे, फाईल्स वेळेत क्लिअर करणे आणि कामात पारदर्शकता आणणे यात ते नेहमीच यशस्वी राहिले आहेत.

निडर निर्णयक्षमता, राजकीय दबावाला बळी न पडता, केवळ नियमात बसणारे आणि लोकहिताचे निर्णय घेण्याची त्यांची धमक वाखाणण्याजोगी आहे. थेट जनतेशी संवाद साधून त्यांच्या समस्या सोडवल्यामुळे सामान्य माणसाचा सरकारी व्यवस्थेवरील विश्वास वाढतो. तुकाराम मुंडे आयुक्त झाल्यापासून राज्यभर भेसळमाफीयांना धडकी भरण्याची वेळ आलीय, म्हणून प्रत्येक विभागात एक तरी तुकाराम हवाच..! असा जनतेत सूर दिसतोय.

वर्षानुवर्षे कायदे तेच होते, नियम तेच होते, खुर्च्याही त्याच होत्या...मग विभागातील अधिकारी काय करत होते.? फरक फक्त ईच्छाशक्ती असणाऱ्या एका माणसाचा होता ! अधिकारी खूप येतात जातात. पण प्रामाणिक पणे काम करण्याची त्यांची मानसिकता हवी.ती अतिशय कमी अधिकाऱ्यांमध्ये असते. आजही प्रशासनात हजारो प्रामाणिकपणे काम करणारे अधिकारी आहेत. परंतु नियम आणि काटेकोरपणे आणला तर व्यवस्थेच्या विरोधात जाणारे म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. त्यामुळे कुठल्याही कारवाईच्या संदर्भात ते जपून किंवा घाबरून असतात. अप्रत्यक्षपणे त्यांच्यावर दबावच असतो. अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनीधींशी जुळवून घ्यावे आणि लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांशी जुळवून घ्यावे, त्यांच्या कलाप्रमाणे वागावे निर्णय घ्यावे हाच प्रकार वर्षानुवर्ष व्यवस्थेमध्ये सुरू आहे. भेसळखोर , लोक आणखी किती दिवस आपल्या ताटात विष वाढणार होते ? असा प्रश्न जनता उपस्थित करत आहे.

ज्यांनी पैशासाठी लोकांच्या आरोग्याशी खेळ केला, त्यांचे काळे धंदे आता उघडे होत आहे. या माणसाने थेट कारवाई दाखवून दिली.ती पुर्णत्वास जावी हीच भावना व्यक्त होताना दिसत आहे.

व्यवस्थेत बदल घडवून आणायचा असेल तर अशा एका तुकाराम मुंडे सारख्या अधिकाऱ्याची ची गरज असते. जनतेच्या आयुष्यात विष कालवून स्वतःची संपत्ती वाढवणाऱ्यांचा भ्रष्ट भेसळखोरांना आणि दुसऱ्यांच्या जीवावर उठणाऱ्यांचा हिशोब कधीतरी होतच असतो. आज आपण परिस्थिती बघतो जो तो लोकप्रतिनिधी आपल्या मर्जीतल्या प्रशासकीय अधिकाऱ्याची आपल्या भागात नेमणूक होईल असे पाहत असतो किंवा करून घेत असतो. कशा साठी.? सगळ्यांना महित असून सुद्धा अनुत्तरीत प्रश्न आहे. हे सर्व प्रकार आजच घडलेले नाहीत. भेसळीचे जाळे एका दिवसात किंवा एका आठवड्यात उभे राहीलेले नाही. इतकी वर्षे हे उद्योग सुरू असताना संबंधित यंत्रणा काय करत होती? तपासणी होत नव्हती का? तक्रारी नव्हत्या का? का जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात होते? जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे, पण त्याचबरोबर निष्क्रियता, हलगर्जीपणा किंवा संभाव्य संगनमत यांचीही चौकशी झाली पाहिजे. कारण दोषी फक्त भेसळ करणारेच नसतात; वेळेवर कारवाई न करणारेही,त्यांना मोकळे सोडणारे तितकेच जबाबदार असतात. ज्यांनी ज्यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले नाही, अशा अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

तक्रार करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून टोल फ्री क्रमांक जाहिर केला आहे. टोल फ्री क्र : १८००२२२३६५



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव**
**८९९९५६६९१७**

# चित्रकार संतोष आवटी यांच्या वारीच्या १०८ चित्र प्रदर्शनास वेद रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्राचे सर्वेसर्वा डॉक्टर रवींद्र पाटील यांच्या शुभेच्छा, आवटी यांचा सत्कार

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील चित्रकार संतोष बाबुराव आवटी यांचा आषाढी वारी निमित्त, विठ्ठलावरील १०८ चित्रांचा प्रदर्शन २५ जुलै २०२६ ते २७ जुलै २०२६ पर्यंत जालना येथील अजिंठा चित्रकला महाविद्यालयात भरणार आहे. इतिहास प्रबोधन संस्था व वेद रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्र तर्फे जे शिवचरित्र साहित्य संमेलन भरले होते त्या शिवचरित्र साहित्य संमेलनाचा लोगो जगभरात प्रसिद्ध करण्यामध्ये चित्रकार संतोष बाबुराव आवटे यांचा सिंहाचा वाटा आहे. चित्रप्रदर्शन सुद्धा जगभरामध्ये प्रसिद्ध झाले. त्या इतिहास प्रबोधन संस्थेचे व वेद रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्राचे सर्वेसर्वा डॉक्टर रवींद्र पाटील, व संस्थेच्या सचिव भारतीताई साठे यांनी नुकतीच चित्रकार संतोष बाबुराव यांच्या घरी त्यांच्या चित्र प्रदर्शनासाठी शुभेच्छा पर भेट दिली. याप्रसंगी त्यांच्या चित्र प्रदर्शनास शुभेच्छा देऊन त्यांचा येतोच सन्मान करण्यात आला. याप्रसंगी वेद रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्राचे प्रांत उपाध्यक्ष प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर यांची आवर्जून उपस्थिती होती. याप्रसंगी आवटी परिवारातर्फे उपस्थितांचे व शुभेच्छा देणाऱ्यांची यथोचित सत्कार करण्यात आला. या चित्र प्रदर्शनाबद्दल चित्रकार संतोष बाबुराव यांनी त्यांना संपूर्ण माहिती दिली व १०८ चित्र प्रदर्शनामध्ये ज्या चित्रांवर आधारित वोडवारीचे पुस्तके येणार आहे त्याचे सुद्धा लिखाण सुरू असल्याचे चित्रकार संतोष बाबुराव यांनी त्यांना दिली. पुढील वर्षी नक्कीच ते पुस्तक या चित्रपटदर्शनाच्या संदर्भामध्ये प्रकाशित होईल अशी आशाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. या पुस्तकाचे प्रकाशन व संपादकीय शब्दप्रभू प्रकाशन जळगाव हे करणार असून यामध्ये चित्रकार संतोष बाबुराव आवटी व प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर यांच्या विठ्ठलावर आधारित कविता असणार आहेत.



या चित्रपटदर्शनाचा सर्वांनी लाभ घ्यावा व वारीमध्ये आपण चालत आहोत याचा भास आपल्याला या चित्रपटदर्शनातून होणार आहे पंढरपूरला न जाता वारी गेल्याचा आनंद आपल्याला मिळणार असून प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉक्टर रवींद्र पाटील यांनी केले आहे.

# जमनाबाई बगडिया चॅरिटेबल ट्रस्टतर्फे दोनशे गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**जालना । प्रतिनिधी**

जमनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने जनता शिक्षण प्रसारक मंडळ, जालना संचलित जनता हायस्कूलमधील इयत्ता पाचवी ते दहावीच्या २०० गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वितरण शनिवारी (ता. १८) करण्यात आले. शिक्षणाला प्रोत्साहन देत आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहण्याच्या उद्देशाने ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे हा उपक्रम राबविण्यात आला.



सौ. नीता पन्नालाल बगडिया, आदित्य पन्नालाल बगडिया, सौ. आयुषी आदित्य बगडिया, भुवनेश आदित्य बगडिया आणि कु. निष्का आदित्य बगडिया यांच्याहस्ते विद्यार्थ्यांना गणवेशांचे वितरण करण्यात आले. यावेळी आदित्य बगडिया म्हणाले, शिक्षण ही समाजाच्या सर्वांगीण प्रगतीची खरी गुरुकिल्ली आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण खंडित होता कामा नये, हीच आमची भूमिका आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच शिस्त, संस्कार, प्रामाणिकपणा आणि समाजसेवेची भावना जोपासून जीवनात मोठे ध्येय गाठावे. भुवनेश बगडिया यांनी आई-वडील, गुरुजन आणि ज्येष्ठांचा आदर करण्याचे आवाहन केले. प्रामाणिकपणे व सातत्याने अभ्यास केल्यास कोणतेही ध्येय अशक्य नसते. आमच्या कुटुंबातून सेवा, दानशूरता आणि गरजूंना मदत करण्याचे संस्कार मिळाले असून *(पान २ वर)*



शहरातील नीळकंठ नगर मधील आदित्य विलास गावंडे या विद्यार्थ्याने नीट परीक्षेत ९८.७८ पर्सेंटाइल प्राप्त केल्याबद्दल जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी निवासस्थानी भेट देऊन त्याचा सत्कार करून कौतुक केले. यावेळी विलास गावंडे, सौ.शालिनी गावंडे, सौ.उषा आगळे, राम सावंत, चंद्रशेखर पाटील, वैशाली पाटील, पंकज आगळे, विकास गावंडे राजेश जटा. वाले आदी उपस्थित होते.

# एकट्याने पंढरीची वारी; माजी सरपंचाचा अनोखा संकल्प

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी : आषाढी एकादशी जवळ आली की वारकऱ्यांना वेध लागतात ते पंढरीच्या विठ्ठलाचे. लाखो भाविक दिंड्यांच्या माध्यमातून पांडुरंगांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतात. मात्र, दिंडीत सहभागी न होता एकट्यानेच पायी वारी करण्याचा दुर्मीळ संकल्प जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील माजी सरपंच लक्ष्मण शिंदे यांनी केला आहे. त्यांच्या या आगळ्या वेगळ्या दिंडीची सध्या परिसरात मोठी चर्चा रंगली आहे. लक्ष्मण शिंदे हे मागील नऊ वर्षांपासून सातत्याने पंढरपूरची वारी करत आहेत. आतापर्यंत ते



आळंदीपर्यंत बसने जाऊन माऊलींच्या दिंडीत सहभागी होत असत. मात्र, यावर्षी त्यांनी घरापासूनच पायी वारीचा संकल्प केला होता. यासाठी ते कुंभारझरी येथील ह.भ.प. सोनुने गुरुजींच्या दिंडीत सहभागी होणार होते. परंत. ऐनवेळी काही कौटुंबिक अडचणींमुळे त्यांना वेळेवर निघता आले नाही. वारीची ओढ स्वस्थ बसू देईना, म्हणून त्यांनी दिंडी निघाल्यानंतर ३ दिवसांनी घरापासून एकट्यानेच पायी प्रवास सुरू केला. मंगळवारी टेंभुर्णीतून निघालेल्या शिंदे यांनी पहिल्या दिवशी ४० किलोमीटरचे अंतर कापत जालन्यात मुक्काम केला. आता ते दररोज २५ ते ३० किलोमीटरचा टप्पा पूर्ण करत आहेत. या प्रवासाबाबत ते म्हणतात, ''दिंडीत मी एकटा चालत असलो, तरी सदैव पांडुरंग सोबत असल्याचा भास होतो.''यांना वेध लागतात ते पंढरीच्या विठ्ठलाचे. लाखो भाविक दिंड्यांच्या माध्यमातून पांडुरंगांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतात. मात्र, दिंडीत सहभागी न होता एकट्यानेच पायी वारी करण्याचा दुर्मीळ संकल्प जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील माजी सरपंच लक्ष्मण शिंदे यांनी केला आहे. त्यांच्या या आगळ्या *(पान २ वर)*




# जामिया उर्दू अलीगढची जालना कॉलेज ऑफ सोशल वर्कला अध्ययन केंद्राची मान्यता

## अदीब व अदीब-ए-माहिर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू; इच्छुकांनी संपर्क साधण्याचे आवाहन

**जालना -प्रतिनिधी**

देशातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था जामिया उर्दू अलीगढ यांनी जालना कॉलेज ऑफ सोशल वर्क, करमवीर प्रतिष्ठान, जालना या संस्थेला माहिती व मार्गदर्शन केंद्र तसेच अधिकृत अध्ययन केंद्र म्हणून मान्यता प्रदान केली आहे अशी माहिती कर्मवीर प्रतिष्ठान या संस्थेचे अध्यक्ष डॉ संजय लाखेपाटील यांनी दिली असून या केंद्रामार्फत अदीब (माध्यमिक समकक्ष) आणि अदीब-ए-माहिर (उच्च माध्यमिक समकक्ष) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश व मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जामिया उर्दू अलीगढकडून या अध्ययन केंद्राला जेयूए-११९३ हा अधिकृत केंद्र क्रमांक देण्यात आला आहे. या अभ्यासक्रमांना भारत सरकारकडून केंद्रीय शासकीय सेवांमधील रोजगाराच्या उद्देशाने मान्यता प्राप्त आहे.

संस्थेच्या माहितीनुसार, या अभ्यासक्रमांच्या परीक्षा दरवर्षी जानेवारी आणि जुलै महिन्यात संगणकीय पद्धतीने घेतल्या जातील. परीक्षा झाल्यानंतर सुमारे दोन महिन्यांत निकाल जाहीर केला जाईल, तर निकालानंतर एका महिन्याच्या आत विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित अध्ययन केंद्राकडे पाठविण्यात येतील. उर्दू विषयातील हे अभ्यासक्रम पूर्ण करण्यास इच्छुक विद्यार्थी व पालकांनी रामनगर, जालना सहकारी साखर कारखान्याजवळील जालना कॉलेज ऑफ सोशल वर्क अथवा जेडीसीए कॉम्प्लेक्स नरिमन नगर जुना जालना येथील कार्यालयात संपर्क साधून प्रवेश व मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच संपर्कासाठी खालील क्रमांक संजय देशमुख ९३७३१६५०६०, रमेश गजर ९८३४५६६२५८ / ९४२१६४९६८२, अनिल वाघमारे ९४२१६४९६८२, राधाकृष्ण देशमुख ९०२२८९८४३२, किशोर ढेकळे ९४२०१४२९२९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# एससी उपवर्गीकरणाच्या विरोधात २८ जुलै रोजी जाफ्राबादमध्ये विराट जनआक्रोश मोर्चासाठी विविध स्तरातून सहकार्याचा वर्षाव

**दत्ता देशमुख**

एससी आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात ५९ जातीच्या बांधवांनी मंगळवार,दि.२८ जुलै रोजी जाफ्राबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या विराट जनआक्रोश मोर्चाच्या तयारीला वेग आला असून समाजबांधवांकडून मोठ्या प्रमाणावर सहकार्य मिळत आहे. जाफ्राबाद तालुक्यासह परिसरातील हजारो नागरिक या मोर्चात सहभागी होणार असल्याने आयोजन समितीने व्यापक नियोजन सुरू केले आहे. मोर्चात सहभागी होणाऱ्या हजारो जनसमुदायासाठी नगरसेवक




अनिल बोर्डे यांनी जलदानाची जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच सभास्थळी पिण्याच्या पाण्याचे स्टॉल उभारण्यात येणार असून दिवसभर आंदोलकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. मोर्चासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रा.अनिल वैद्य यांनी २०० निळे ध्वज (झेंडे) भेट दिले आहेत. हे ध्वज मोर्चात सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यांना वितरित करण्यात येणार असून मोर्चाला एकसंध आणि शिस्तबद्ध स्वरूप मिळण्यास त्याची मदत होणार आहे. दरम्यान, मोर्चाच्या प्रचारासाठी आणि गावागावातील जनजागृती मोहिमेसाठी गौतम कासारे यांनी सलग दहा दिवस विनामूल्य वाहन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. या वाहनाद्वारे तालुक्यातील विविध गावांमध्ये प्रचार,जनसंपर्क आणि मोर्चाचे आवाहन करण्यात येत आहे. याशिवाय सिल्लोड येथील धम्म बांधवांनी मोर्चाच्या प्रचारासाठी हजारो पोस्टर्स, बॅनर्स आणि निळे झेंडे उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे मोर्चाच्या प्रचाराला मोठी चालना मिळाली *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.